# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – ०८ डिसेंबर २०१५

## विद्यार्थ्यांसाठी मुंबई विद्यापीठाचे 'डिजीटल लॉकर'

## पदवी प्रमाणपत्रांचे व्हेरिफिकेशन होणार ऑनलाईन

मुंबई - मुंबई विद्यापीठाने डिजीटल पाऊल टाकत विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र आणि गुणपत्रिकांचे डिजीटल व्हेरिफिकेशनची सुविधा उपलब्ध करुन देत एक अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. मुंबई विद्यापीठाने विद्यार्थ्यांना डिजीटल लॉकर्सची सोय उपलब्ध करुन दिली असून "मायइजीडॉक्स" च्या सहाय्याने ग्लोबल डॉक्युमेंट ऑथेंटिकेशन नेटवर्क या प्लॅटफॉर्मवर विद्यार्थ्यांना आता पदवी आणि गुणपत्रिका पडताळणीची सेवा ऑनलाईन मिळणार आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून ही सुविधा सध्या शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना व मुंबई विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिली जाणार आहे. भारतातील पारंपरिक विद्यापीठापैकी असा महत्वपूर्ण निर्णय घेणारे मुंबई विद्यापीठ हे देशातील पहिले विद्यापीठ ठरले आहे. सुरुवातीला २०१ ५ चे पदवीप्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले जाणार आहेत.त्यानंतर जाहिर होणा-या निकालाच्या गुणपत्रिका या योजनेद्वारे उपलब्ध होणार असुन ,येत्या शैक्षणिक वर्षापासून पूर्णतः ही प्रक्रिया राबवली जाणार आहे.

आजमितीला भारतात शैक्षणिक संस्थांच्या मार्फत विद्यार्थ्यांना गुणपत्रक आणि पदवी प्रमाणपत्र हे कागदावर उपलब्ध करुन दिली जातात ,ती शैक्षणिक कागदपत्रे नंतर संबंधित शैक्षणिक संस्थेमार्फत मुळ कागदपत्रांशी पडताळणी करुन त्यांची खातरजमा केली जाते.यामध्ये अनेकवेळा वेळेचे अपव्यय होतांना दिसून येते,तसेच अनेकदा गैरप्रकार होण्याचा धोकाही संभावतो. मात्र अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने आजमीतीला भारतात महत्वाची कागदपत्रे अधिक सुरक्षितरित्या उपलब्ध करुन देण्यासाठी हालचालीना वेग आला असुन त्याच धर्तीवर मुंबई विद्यापीठाने महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला असून विद्यापीठात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांची शैक्षणिक कागदपत्रे ऑनलाईन पध्दतीने विविध सुरक्षेच्या दृष्टिकोनातून तयार करुन उपलब्ध करुन दिले जाणार आहेत.यामध्ये उच्च प्रतीच्या सुरक्षिततेचे सर्व निकष पाळले जाणार आहेत.

### ध्येय आणि उद्दीष्ट्ये

-शैक्षणिक कागदपत्रांची पडताळणी पध्दत अधिक जलद आणि सोपी व्हावी या दृष्टीकोनातून,विद्यार्थ्याला गरज पडेल तिथे त्याला कागदपत्रे पडताळणी सुलभ आणि जलदगतीने उपलब्ध करुन देणे

- गुणपत्रिका आणि पदवी प्रमाणपत्राबाबत तसेच दिक्षान्त प्रमाणपत्रामध्ये होणा-या गैरप्रकारांना आळा बसण्यासाठी

-डिजीटल स्वाक्षरीयुक्त गुणपत्रिका आणि शैक्षणिक कागदपत्रे उपलब्ध करुन देणे

-उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना इतर शैक्षणिक संस्थामध्ये गुणपत्रक पडताळणीसाठी लागणारा वेळ कमी करणे आणि इतर विद्यापीठांना सहजरित्या पडताळणी आणि पात्रतेचे निकष जलदगतीने होणेसाठी

-गुणपत्रक छपाईसाठी लागणारा वेळ कमी करणे तसेच विद्यार्थ्यांना लवकरात लवकर गुणपत्रिका मिळणे

- गुणपत्रिका सुरक्षेच्या दृष्टीकोनातून तयार करताना वाटरमार्क पध्दतीचा अवलंब करुन विद्यार्थ्यांना त्या कुठेही छपाई करता येऊ शकणार

-दिक्षान्त प्रमाणपत्रांच्या  सुरक्षतेसाठी विशेष प्रयोजन

- या योजनेनुसार विद्यार्थ्यांला  लॉगिन आयडी आणि पासवर्डच्या मदतीने गुणपत्रिका   पदवी प्रमाणपत्र उपलब्ध होणार असून ऑनलाईन पध्दतीने त्याची पडताळणी करता येणार आहे.

## ही प्रक्रिया खालील पध्दतीने कार्यान्वित होणार

-निकाल जाहीर झाल्यावर मुंबई विद्यापीठाच्या रिपोझटरी मध्ये माहिती अपलोड केली जाणार

- हा सर्व डेटा २५६ बीट इनस्क्रिप्टेड डिडीटल स्वाक्षरीयुक्त असणार

-उपलब्ध माहितीवरुन गुणपत्रिका तयार केल्या जाणार असुन खातरजमा केल्यावर छपाई करता येणार

-गुणपत्रिका डाऊनलोड करण्यासाठीच्या सर्व सुचना आणि त्याची एक लिंक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिली जाणार

-सुरक्षेचे सर्व निकषांची काटेकोरपणे अंमलबजावणी होणार असून पडताळणी करता येणार

-गुणपत्रिकांची पडताळणी करणा-या कोणत्याही संस्थेला  विद्यार्थ्यांनी विशिष्ट शुल्क भरल्यानंतर पडताळणी करता येणार आहे

- विद्यार्थ्यांना शैक्षणिक कागदपत्रांची पडताळणी  करण्यासाठी पडताळणी संस्थेच्या वतीने इमेल पाठवला जाईल.

विद्यार्थ्यांना अधिक जलदगतीने गुणपत्रिका आणि पदवी प्रमाणपत्रांच्या पडताळणीची डिटीटल प्लॅटफॉर्म सेवा उपलब्ध करुन देत मुंबई विद्यापीठाच्या या  निर्णयाचे सर्वच स्तरातून स्वागत केले  जात आहे.

## कोट-

“आजच्या स्पर्धात्मक युगात गुणपत्रिका आणि पदवी प्रमाणपत्र याची सत्यता आणि सुरक्षा अत्यंत महत्वाची आहे.व्यवसायांनी अंगिकारलेल्या ऑनलाईन सुरक्षा पध्दतींचा स्वीकार उच्च शिक्षणामध्ये त्वरीत होणे आवश्यक आहे त्यादृष्टीने मुंबई विद्यापीठाने घेतलेला हा महत्वाकांक्षी निर्णय आहे , गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी तसेच पर्यावरणपुरक आणि शास्वत विकासाच्या दृष्टीकोनातून मुंबई विद्यापीठाने टाकलेले हे एक महत्वाचे पाऊल आहे.”

- डॉ.संजय देशमुख,कुलगुरु मुंबई विद्यापीठ
- ------------------------------------------------------------------------
-

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)